**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1228/2007.**

श्री गोपाल पंढरी शहारे
मु. चप्राड, पो. सोनी
ता. लाखांदूर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विजय कांत दुबे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा परिषद भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद भंडारा व जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद भंडारा तसेच शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद भंडारा व जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद भंडारा हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.10.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त (आस्थापना) नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

संदर्भ :– 1) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक असक/1005/प्र.क्र.29 (भाग–9)/2005 वित्तीय सुधारणा–9 दि. 24.1.2006 प्रमाणे तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे पत्र दि. 9.5.2006 मधील सुचनानुसार.

संदर्भ :– 2) शासन निर्णय क्रमांक एस.एस.एन.1000/(282)/2001 मा.शि. शालेय शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई – 32 दि. 2 सप्टेंबर 2002.

संदर्भ :– 3) रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे पत्र क्र. इएसई–2001 प्र.क्र.76/रो.स्वं. रो.1 दि. 29 नोव्हेंबर 1001 प्रमाणे

संदर्भ :– 4) शासन निर्णय क्रमांक बी.सी.सी.2002/1306/16 ब मंत्रालय मुंबई32 दि. 6 मे 2006

संदर्भ :– 5) पअंक1001/724/प्र.क्र.54/2001/16 अ दिनांक 31 ऑगष्ट 2002 तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प.अ.क. 1002 प्र.क्र.68/2002/16 अ दि. 30.9.2002.

संदर्भ :– 6) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सी.सी. सी/2004/188/66 अ मंत्रालय मुंबई दि. 23.6.2004 प्रमाणे

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भांकित पत्र कृपया पहावे :–

3 वर्षे अंशकालीन काम केलेल्या बी.एड. शिक्षकाच्या यादी (प्रतिक्षा) मधून दि. 20.10. 2006 पर्यंतचे ज्यांना कामावर घेण्यात आले त्यांची नावे, पद, वेतनश्रेणी, कार्यालयाचे नाव स्थाई पत्ता नियुक्तीचे स्वरुप यांची लेखी माहिती.

बी.एड. शिक्षकाच्या प्रतिक्षा यादी मधे माझे नाव असून मला शासकिय सेवेत का घेण्यात आले नाही मला सेवेत सामावून घेण्याची जबाबदारी कोणत्या अधिका–याची होती त्याची

नावे, पद व पत्ता याची माहिती. मला शासकिय सेवेत न घेतल्यामुळे माझे जे आर्थीक व मानसीक नुकसान होत आहे त्याची भरपाई कोणकडून मिळेल मला नियुक्ती कोणाकडून मिळेल कधी मिळेल याची लेखी व प्रमाणित अधिकृत माहिती देण्याची विनंती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 11.11.2006 रोजी विभागीय आयुक्त नागपूर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे सदरच्या अर्जाचे हस्तांतरण करुन सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना पाठविलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी पुन्हा विभागीय आयुक्त (महसूल) यांचेकडे अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपील दि. 19.1.2006 रोजी दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा दि. 5.2.2007 रोजी गट विकास अधिकारी (प्रशा.) तथा माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय नागपूर यांनी सदरचे अपील पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्य.) हस्तांतर करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे हस्तांतर केलेले दिसून येते. व सदरच्या प्रथम अपीलाप्रमाणे सुध्दा विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने व प्रथम अपीलाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही माहिती अधिकारी यांची असल्यामुळे त्यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

अर्जदार श्री गोपाल पंढरी शहारे, मु. चप्राड, पो. सोनी ता. लाखांदूर जि. भंडारा यांनी माहिती अधिकारा अंतर्गत माहिती मिळण्यासाठी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद भंडारा कडे अर्ज सादर न करता सरह प्रथमतः मा. विभागीय आयुक्त (आस्थापना) नागपूर विभाग नागपूर यांचे कार्यालयास दि. 27.10.2006 अन्वये सादर केला होता. त्यानुसार मा. विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर या कार्यालयाद्वारा मा. मुख्य

कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचे कार्यालयास त्यांचे पत्र क्र. विशा/कार्या/11(5)/कावि/1840/06 दि. 10 नोव्हेंबर 2006 अन्वये पत्र देवून श्री गोपाल पंढरी शहारे, मु. चप्राड, पो. सोनी ता. लाखांदूर जि. भंडारा यांचे अर्जानुसार माहिती विहित मुदतीत पुरविझयाबाबत आदेशीत केले होते. सदर पत्राची प्रत अर्जदार श्री गोपाल पंढरी शहारे यांना सुध्दा दिलेली होती व त्यात माहिती अधिकारा अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचे कार्यालयाशी व संबंधित अधिका–यांशी संपर्क करावा व आवश्यक माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले होते. परंतु माहिती मिळविण्याचे दृष्टीने अर्जदाराकडुन शिक्षण विभाग जिल्हा परिषद भंडारा या कार्यालयास कोणताही अर्ज अर्जदाराकडुन आतापर्यंत आलेला नाही.

गट विकास अधिकारी (प्रशा.) तथा माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय नागपूर यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. विशा/कार्या/11(5)/कावि/160/07 दि. 5 फेब्रुवारी 2007 रोजी श्री गोपाल पंढरी शहारे यांना दिलेल्या पत्रात श्री शहारे यांचा अपील अर्जावरुन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांनी अद्याप माहिती पुरविलेली नसल्यामुळे सदर प्रकरणी विभागीय आयुक्त हे माहिती अधिकारी तथा अपीलीय अधिकारी प्रथम किंवा द्वितीय नसुन अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य.) हे असल्याने आपण माहिती मिळविण्याबाबत त्यांचेकडे पाठपुरावा करावा सबब आपला अपिल अर्ज शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे पाठविण्यात येत आहे. असे कळविलेले आहे. सदर पत्राची प्रत शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद भंडारा यांना देवून अर्जदाराने मागितलेली माहिती आपल्या विभागाशी संबंधीत असल्यामुळे आपणाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे. आपण त्वरीत कार्यवाही करुन अर्जदारास माहिती पुरवावी यात कोणतीही हयगय होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी असे आदेशीत केले होते. सदर पत्र मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचे कार्यालयाकडुन शिक्षण विभाग जिल्हा परिषद भंडारा या कार्यालयात दि. 8.3.2007 ला

प्राप्त झाले. या पत्राव्यतिरिक्त अर्जदाराचा माहिती अधिकारा अंतर्गत पत्र तसेच अपिल पत्र तसेच त्यासंदर्भात माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय नागपुर यांनी सुचविल्यानुसार कोणताही संपर्क वा पत्रव्यवहार अर्जदार श्री गोपाल पंढरी शहारे यांनी केलेला नाही.

माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय नागपुर यांचे दि. 5 फेब्रुवारी 2007 चे पत्राच्या प्रतिपिली शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांना दिलेलया आदेशानुसार या कार्यालयाने अर्जदाराने मागणी केल्यानुसार आवश्यक ती माहिती शिक्षण विभागात उपलब्ध नसल्यामुळे सदर माहिती जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी भंडारा यांचेकडून मिळविण्यासाठी कार्यालयाचे पत्र क्र. भंजिप/शिक्षण/प्राथ/डे6/1256/07 दि. 15.3.2007 अन्वये अपीलार्थी अंशकालीन म्हणुन काम केलेले आहे किंवा कसे याबाबत त्यांचे बी.एड. प्रतिक्षा यादीसह संपुर्ण शैक्षणीक अर्हतेसह त्वरीत पाठविण्याची विनंती करण्यात आली होती. सदर पत्राची प्रत श्री गोपाल पंढरी शहारे यांना माहितीस्तव दिलेली होती.

त्यानुसार माहिती अधिकारी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी भंडारा यांचे कार्यालयातुन त्यांचे पत्र क्र. 1537/07 दि. 17.3.2007 नुसार माहिती प्राप्त झाली. त्यात अर्जदाराचे नोंदणी दिनांक व पात्रता वाढीचे दिनांक अतिरिक्त पात्रतेची नोंद दिनांक तसेच त्यांनी तीन सत्र अंशकालीन काम केल्याची नोंद दिनांक कळविलेले आहे. त्यानुसार प्राप्त झालेली माहिती श्री गोपाल पंढरी शहारे यांना या कार्यालयाचे पत्र क्र. भंजिप/शिक्षण/प्राथ/डे6/1515/07 दि. 30.3.2007 अन्वये देण्यात आलेली आहे. त्याची प्रत गट विकास अधिकारी (प्रशा.) तथा माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय नागपूर विभाग नागपूर यांना सादर करण्यात आलेली आहे.

1) महोदय, अर्जदार श्री गोपाल पंढरी शहारे यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत या कार्यालयास माहिती मागीतलेली नाही.

2) शिक्षण विभागाशी अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी यांचेकडे अपिल अर्ज सादर केला नाही.

3) माहिती अधिकारी विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांनी दिलेल्या निर्देशानुसार शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांनी अर्जदारास माहिती पुरविलेली आहे.

4) मा. विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचे निर्देशानुसार शिक्षण विभागात जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी जिल्हा भंडारा यांचेकडुन प्राप्त झालेली माहिती अर्जदारास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे कार्यवाही शिक्षणाधिकारी कार्यालयाने पुर्ण केलेली आहे. अशी या कार्यालयाची धारणा आहे.

सबब माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या निर्णयास्तव सविनय सादर.

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात उपलब्ध नसते तसेच जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाधिकारी हयांचेकडे सुध्दा उपलब्ध नसते. व त्यामुळे सदर माहिती जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी यांचेकडून मिळविण्यासाठी कार्यालयाचे पत्र क्रमांक भंजिप/शिक्षण/प्राथ/डे6/1256/07 दि. 15.3.2007 अन्वये अपीलार्थी अंशकालीन म्हणुन काम केलेले आहे किंवा कसे याबाबत त्यांचे बी.एड. प्रतिक्षा यादीसह संपुर्ण शैक्षणीक अर्हतेसह त्वरीत पाठविण्याची विनंती करण्यात आली होती. सदर पत्राची प्रत श्री गोपाल पंढरी शहारे यांना माहितीस्तव दिलेली होती. त्यानंतर दि. 30.3.2007 रोजी माहिती प्राप्त झाल्यावर दि. 30.3.2007 रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता अर्जदार यांनी ज्या कार्यालयात माहिती उपलब्ध आहे त्या कार्यालयाच्या माहिती अधिका–याकडेच अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अर्ज करणे आवश्यक ठरते. माहितीशी संबंध नसलेल्या इतर कार्यालयात अर्ज केल्यास किंवा माहिती विहित मुदतीत मिळाली नाही असे म्हटल्यास विलंबाचा मुद्या निकाली निघतो. तसेच अपीलकर्ता यांनी

सदरची माहिती ही सार्वजनिक व्यापक हिताकरीता मागितलेली दिसून येत नाही तर स्वहिताकरीता मागितलेली दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा उद्येश सार्वजनिक व्यापक हिताकरीता माहिती मागणे असे आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 2.4.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.